नामदेव ढसाळ यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९४९ रोजी पुणे जिल्ह्यातील कनेरसपूर गावात झाला. वडील लक्ष्मण आणि आईचे नाव साळुबाई. कित्येकदा ढसाळ आपल्या नावापुढे आईचे नाव लावत. नामदेव ढसाळांनी आपले प्राथमिक शिक्षण आपल्या गावातच घेतले. त्यानंतर ते मुंबईला गेले. सुरुवातीचे त्यांचे आयुष्य मुंबईतील कामाठीपुरा किंवा गोलपिठा या भागात व्यतीत झाले. कवी म्हणून सर्वमान्य होण्याआधीच्या काळात त्यांनी टॅक्सी ड्रायव्हर म्हणून काम केले. पुढे राजा ढाले यांच्या सोबत त्यांनी दलित पँथरची स्थापना केली. (१९७२)

नामदेव ढसाळांचे कविता, कादंबरी व ललित तसेच वैचारिक असे विविध प्रकारचे लेखन प्रसिद्ध आहे. सुधीर बेडेकर यांच्या 'मागोवा' मासिकात 'भिंतीचा अनादिबंध' ही कथा प्रसिद्ध झाली.

नामदेव ढसाळांनी लघुनियतकालिकाच्या चळवळीतून काव्यलेखनाला सुरुवात केली. त्यांच्या 'गोलपिठा' या पहिल्याच काव्यसंग्रहाने मराठी कवितेला वळण देण्याचे काम केले. 'गोलपिठा'मध्ये आलेले अनुभवविश्व, प्रतिमाविश्व हे मराठी साहित्याला अनोखे होते. परिवर्तनवादी संवेदनशीलतेतून उदयाला आलेली नामदेव ढसाळांची विचारसरणी या संग्रहातून प्रत्ययाला येते. मुंबईमधील वेश्यावस्तीतील 'गोलपिठा'चा भाग कवितेत जसाच्या तसा ढसाळांनी मांडला. तिने पांढरपेशा, रुढ काव्याभिरुचीला हादरा दिला. यातील कविता त्यांच्या बंडखोर आत्म्याचे दर्शन घडवतात बाबासाहेब आंबेडकरांवर लिहिलेली त्यांची कविता आपल्याला अंतर्मुख करते.

**'जो नाकारतो सत्तेची चाकरी नि**
**येसकरपणाची भाकरी**
**जो आणतो जनशक्तीच्या किमयेला गाज**
**जो केकीच्या नि रमच्या चिखलात रुजत नाही**
**जो पायपुसण्यावर बसत नाही...**

या कवितांमध्ये एक आंतरिक लय असून त्यात आशयसंपन्नता आणि शब्दवैभव आहे. ढसाळांची काव्यलेखनामागची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' या त्यांच्या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत आपल्या काव्यनिर्मितीविषयी ते म्हणतात,

'कला ही दोन जगात विभागलेली आहे. एक जग आहे घमेलंवाल्यांचं. दुसरं जग आहे ते डबुलंवाल्यांचं. मी जर कविता लिहितो, छापतो; तर या दोन्हीपैकी एका जगाचा मी निश्चितच आहे आणि ते माझं जग आहे घमेलंवाल्यांचं... माझ्या वर्गीय हिताच्या दृष्टीने कविता आणि राजकारण या परस्पर विभिन्न गोष्टी राहिलेल्या नाहीत. मी एखादी कविता लिहितो म्हणजे एखादी राजकीय कृतीच करत असतो... मी माझ्या कवितेला वर्गीय हत्यार मानतो.'

नामदेव ढसाळांची कविता ही त्यांच्या जगण्याचाच एक भाग झालेली आहे. या कवितासंग्रहातून त्यांची वैचारिक भूमिका स्पष्ट होते. 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले,' 'पाब्लोच्या मरणाने', 'आपण काय शिकलो' यासारख्या कवितांमधून त्यांच्यावरील साम्यवादी विचारांचा प्रभाव लक्षात येतो. 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शनी' (१९७६) या तिसऱ्या कवितासंग्रहामध्ये इंदिरा गांधींच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीमधील कर्तृत्वविषयीचा आदरभाव व्यक्त झाला आहे. हा संग्रह म्हणजे इंदिरा गांधींवरील उद्देशिका आहेत. त्यांच्या 'तुही इयत्ता कंची' या चौथ्या संग्रहातील 'कामाठीपुरा' 'पिलहाऊसचा मृत्यू', 'संत फॉकलंड रोड,' 'मौलाना भेंडीबाजार' इ. कवितांमधून वेश्यावस्तीचे चित्रण आलेले आहे त्यांची ही कविता परिवर्तनवादी कार्यकर्त्याची आणि त्याचबरोबर संवेदनशील व्यक्तीची बंडखोर अशी कविता आहे. सामाजिक आणि आर्थिक विषमता, राजकीय अव्यवस्था, महानगरातील बकालपणा ह्याविरुद्धचा असंतोष, ढसाळ आपल्या कवितांमधून व्यक्त करतात. डॉ. आंबेडकरांवरील कविता हे 'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता' या कवितासंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. 'खेळ' आणि 'गांडू बगीचा' या कवितांमधून ढसाळांच्या कवितेचे वळण थोडेसे गूढ भासू लागले.

१९९५ साली ढसाळांचा 'या सत्तेत जीव रमत नाही' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. या कवितांमधून कवी स्वतःचे तटस्थपणे, कठोर आत्मपरीक्षण करतो. ढसाळांच्या आंबेडकरांवरील सर्व कवितांचे संकलन 'तुझे बोट धरून चाललो आहे' या संग्रहात केले आहे आंबेडकरी चळवळ, आंबेडकरांच्या निर्वाणानंतरची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती यावर या कवितांमधून भाष्य केले आहे. 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' आणि 'निर्वाणा अगोदरची पीडा' या संग्रहामध्ये कवी पुन्हा आपल्या मूळ कवितेकडे आलेला दिसतो. 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' या संग्रहातील 'माझ्या प्रिय कविता' या कवितेत ते म्हणतात,

**'ज्या भाकरीने सदा सर्वकाळ**
**मला सतावले**
**ती भाकरी करु शकली नाही माझा पराभव**
**मी उजागर केली जगण्यावरील निष्ठा**
**आणि लिहिले जगण्याचे शुद्ध अभंग'**

जगण्याचे तत्त्वज्ञान सहज सोप्या भाषेत ढसाळ मांडतात. 'मायस्थेनियाग्रेव्हीज' या दुर्धर आजारातून सावरल्यावर त्यांनी 'निर्वाणाअगोदरची पीडा' का काव्यसंग्रह लिहिला. आपल्याला जीवदान देणाऱ्या डॉक्टरांना त्यांनी हा संग्रह अर्पण केला. यातील कवितांचे रुप आत्मचरित्रात्मक आहे. ढसाळ स्वतःला नास्तिक म्हणवत असल्याचे काही संदर्भ या संग्रहात आहेत. बहुतेक ठिकाणी बौद्ध दर्शनाचे उल्लेख यात येतात. दलितांसोबत शोषित वंचितांचा 'नाही रे' चा वर्ग वेगाने वाढतोच आहे ही ढसाळ यांच्या प्रस्तुत संग्रहातील जाणीव आहे. कोलटकर, चित्रे या कवींवर त्यांनी कविता लिहिल्या. सार्वभौम मरणाच्या चिंतनातून ते आपली व्यथा मांडतात. ढसाळांच्या एकूणच कवितांना दार्शनिक, चिंतनशील आणि परिवर्तनवादी संवेदनशीलतेची बैठक होती. मराठी कवितेच्या प्रवाहात या कवितेने महत्त्वाची भर घातली. ढसाळांच्या एकूणच कवितासंग्रहातील कवितांची भाषा ही व्यामिश्र स्वरुपाची आहे. त्यांच्या कवितेने वेश्या, हिजडे, भडवे, दलाल, मराठी कवितेत आणले. फॉकलंड रोड, मौलाना भेंडीबाजार, कामाठीपुरा यासारख्या वस्त्यांवर कविता लिहिली. मुंबईतील कामगार, कष्टकरी, दलित वंचितांचे जगणे त्यांनी कवितेतून शब्दबद्ध केले. ढसाळ दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर कविता लेखन करत असत. ढसाळांच्या कवितेची भाषा ही केवळ त्यांची स्वतःची भाषा ठरते. त्यांच्या कवितेचे अनुभवविश्व त्यातील शब्द इतके अस्सल आहेत की त्याचा अनुवाद करणे ही अतिशय कठीण गोष्ट आहे. कोणत्याही प्रतिमा-प्रतीकांचा, अलंकारांचा सोस तिला नाही. मराठी कविता विश्वामध्ये ढसाळांच्या कवितेची भाषा ही स्वतः ढसाळांची भाषा आहे हे तिचे वेगळेपण आहे. काही संग्रहातून त्यांनी 'हेटरिक्स'ची वक्तृत्वपटुतेची जोखीम पत्करूनही कवितेची प्रचलित भाषा मोडीत काढली व नव्याने काव्य भाषा निर्माण केली. सौंदर्याच्या सांकेतिक कल्पना झुगारुन त्यांनी आत्मचरित्रात्मक स्वरुपाची कविता लिहिलेली आढळते. आशयाच्या गरजेनुसार नवनव्या भाषिक प्रयुक्त्या ढसाळांच्या कवितेतून येताना दिसतात. कधी या कवितेत कोमलता, गोडवा येतो तर कधी मानवतावादी भूमिका या भाषेतून जाणवते.

कवितेसोबतच कादंबऱ्या, वैचारिक लेखनात ढसाळांनी मोलाची भर घातली. 'हाडकी हाडवळा', 'निगेटिव्ह स्पेस' या त्यांच्या दोन कादंबऱ्या आहेत दलितांचे शोषण, त्यांच्यावर होणारा अन्याय अत्याचार, दलित-सवर्ण संबंध, गावगाडा याचे प्रभावी चित्रण या कादंबरीत येते. 'निगेटिव्ह स्पेस' या कादंबरीत आंबेडकरी चळवळ, डाव्यांची विचारसरणी यानिमित्ताने येणारे अनेक विचार, त्यानिमित्ताने ढसाळांचे विचार व त्यावरचे त्यांचे भाष्य या कादंबरीत येते.

एक कवी, लेखक, सामाजिक कार्यकर्ता यासोबत एक चित्रकारही अशी ओळख आहे. गायतोंडे-आरा-हुसेन या चित्रकारांविषयी त्यांना एक आंतरिक ओढ होती. आपल्या कवितेतून या चित्रकारांना त्यांनी अभिवादन केले आहे.

ढसाळांच्या मृत्यूनंतर 'दलित पँथर' एक संघर्ष' हे त्यांचे पुस्तक प्रकाशित झाले. १५ जानेवारी २०१४ रोजी पहाटे दुर्धर आजाराने ढसाळांचे निधन झाले. एक कवी, लेखक, सामाजिक कार्यकर्ता म्हणून ढसाळांनी आपली मोहोर येथील जनमानसावर खूप ठळकपणे उमटवली.

**डॉ. वैजयंतीमाला भोसले-जाधव**
फ्लॅट नं. ९, सर्व्हे नं. ३५/३, संविद सोसायटी,
जुन्या ग्रामपंचायतीजवळ, सरस्वती शाळेच्या मागे,
टिंगरेनगर (विद्यानगर), पुणे ४११०५२

---

**नामदेव ढसाळ**
जन्म : १५ फेब्रुवारी १९४९ निधन : १५ जानेवारी २०१४

---

**काव्यसंग्रह**
१. गोलपिठा (१९७१)
२. मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले (१९७५)
३. आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शनी (१९७६)
४. तुही इयत्ता कंची (१९८१) ५. खेळ (१९८३)
६. या सत्तेत जीव रमत नाही (१९९५)
७. मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे (२००५)
८. तुझे बोट धरुन चाललो आहे मी (२००६)
९. निर्वाणाअगोदरची पीडा (२०१०)
१०. चिंध्याची आणि इतर कविता (२०१२)
११. मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे (निवडक कविता) संपादक सतीश काळसेकर/प्रज्ञा दया पवार (२००७)

**कादंबरी**
हाडकी हाडवळा (१९८१) निगेटिव्ह स्पेस (१९८७)

**वैचारिक**
आंधळे शतक (१९९५)
आंबेडकरी चळवळ आणि सोशालिस्ट कम्युनिस्ट (२००१)
सर्व काही समष्टीसाठी (२००६)
बुद्ध धर्म आणि शेष प्रश्न

**साहित्यिक येती घरा...**
**आपल्या आवडत्या लेखकाचे छायाचित्र व स्वाक्षरी असलेला मग आपल्या संग्रही हवाच !**

- पु. ल. देशपांडे
- विंदा करंदीकर
- बा. भ. बोरकर
- प्र. के. अत्रे
- बाबा आमटे
- कुसुमाग्रज
- शांता शेळके
- सुरेश भट
- मिर्झा ग़ालिब
- व. पु. काळे
- समर्थ रामदास
- संत ज्ञानेश्वर
- संत तुकाराम
- साने गुरुजी
- फादर स्टीफन
- ग. दि. माडगूळकर
- महात्मा गांधी
- आईनस्टाईन
- चार्ली चाप्लीन
- दासू वैद्य
- फ. मु. शिंदे
- भालचंद्र नेमाडे





गमभन प्रकाशन
३७९ शनिवार, पुणे ४११०३०
दूरध्वनी : २४४५ ८१ ४१
gamabhanaprakashan@gmail.com
www.gamabhana.in